अर्थसंकल्पिय अनुदान सन २०१७-२०१८-
मागणी क्रमांक वाय-२, २२१५-पाणी पुरवठा व स्वच्छता
या लेखाशीर्षांतर्गत पुनर्विनियोजन करणेबाबत.....

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांक : पुनर्वि- २०१८/प्र.क्र.३९/पापु-०४,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक - २७ मार्च, २०१८.

शासन निर्णय :-

सन २०१७-१८ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत चंद्रपूर व जालना जिल्ह्यात आर ओ संयंत्र बसविण्यासाठी येणारा रुपये २५ कोटी इतका निधी अतिरिक्त खर्च भागविण्यासाठी वित्त विभागाने सुधारित अंदाजात उपलब्ध करुन दिलेला आहे. या प्रयोजनासाठी रुपये १ हजारच्या लाक्षणिक पुरवणी मागणीस मान्यता देण्यात आली असून, उर्वरित निधी विभागाकडे उपलब्ध होणाऱ्या बचतीमधून भागवावयाचा आहे. त्यानुसार, विभागाच्या “मागणी क्र. वाय-२, २२१५ -पाणी पुरवठा व स्वच्छता या लेखाशीर्षांतर्गत “१०२, ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम (०२) (२८) प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची देखभाल व दुरुस्ती (कार्यक्रम)” या योजनेखाली होणाऱ्या बचतीमधून **सोबतच्या विवरणपत्रात** नमूद केल्याप्रमाणे, **रुपये २४,९९,९९,०००** (अक्षरी रुपये चोवीस कोटी नव्याण्णव लक्ष नव्याण्णव हजार फक्त) इतकी रक्कम, **पुनर्विनियोजनाने** “(०२)(२९) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम-सहाय्यीकृत बाबी व पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षणासाठी अर्थसहाय्य (२२१५ ९९७१) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)” या योजनेसाठी उपलब्ध करुन देण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

२. वित्त विभाग, शासन निर्णय, विअप्र-१०.०८/प्र.क्र. ७०/२००८/विनियम, दिनांक १५ मे,२००९ अन्वये वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८, भाग-एक मधील उपविभाग तीन अनुक्रमांक १ महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका परिच्छेद १६२ ,१६३, व १६४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक -३९/अर्थ-१८, दिनांक २१.२.२०१८ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार सदर आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०१८०३२७०९५३५४५५२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Yashwant Tedgya Padvi

Digitally signed by Yashwant Tedgya Padvi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42f023d235c1f55c387492762e66530fd58085d2893f88445cf00fc7709a8080, serialNumber=c96ec3b84dfb89ca1fbee688d0dbc9e15c61e7e091602f1cc5c94657fc4d9c86, cn=Yashwant Tedgya Padvi
Date: 2018.03.27 16:09:02 +05'30'

(य. टे. पाडवी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई/२ नागपूर (लेखापरीक्षा /लेखा व अनुज्ञेयता)
२. जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व
३. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, मुंबई
४. अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई ४०० ०२१.
५. उप लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नाशिक,पुणे,अमरावती,औरंगाबाद व नागपूर
६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी

८. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
९. वित्त विभाग(व्यय-३), अर्थसंकल्प-१८,मंत्रालय, मुंबई
१०. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
११. कक्ष अधिकारी/ लेखा अधिकारी, पापु-१०, पापु-१२, पापु-२०,
१२. निवडनस्ती (पापु-०४).

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग/पापु-०४

अर्थसंकल्पिय अनुदान सन २०१६-२०१७- मागणी क्रमांक वाय-२, २२१५-पाणी पुरवठा व स्वच्छता या लेखाशीर्षांतर्गत पुनर्विनियोजन करणेबाबत.....

शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक : पुनर्वि- २०१८/प्र.क्र.३९/पापु-०४ , दिनांक २७ मार्च २०१८ सोबतचे **विवरणपत्र**

(रुपये हजारात)

अ.क्र.	लेखाशिर्ष	सन २०१७-१८ करीता मंजूर तरतूद	पुरक मागणी २०१७-१८	एकूण अनुदान	बचतीद्वारे पुनर्विनियोजित करावयाची तरतूद	पुनर्विनियोजना नंतर उपलब्ध तरतूद	पुनर्विनियोजनाची कारणे
१	२	३	४	५	६	७	८
१	"मागणी क्र. वाय-२, २२१५ -पाणी पुरवठा व स्वच्छता- ०१, पाणी पुरवठा, १०२ ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रम, (०२) जिल्हा परिषदांना योजनांतर्गत अनुदाने (०२) (२८) प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची देखभाल व दुरुस्ती (कार्यक्रम), (२२१५ ९९६२), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)"	५०००००	००	५०००००	(-) २४९९९९	२५०००१	मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत देखभाल व दुरुस्तीसाठी मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाच्या अनुषंगाने योजनेच्या निकषात धोरणात्मक बदल प्रस्तावित असल्याने या योजनेअंतर्गत कोणताही खर्च संभवत नाही. त्यामुळे या योजनेखालील अनुदानात बचत संभवत आहे.
२	"मागणी क्र. वाय-२, २२१५ -पाणी पुरवठा व स्वच्छता १०२, ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रम (०२) जिल्हा परिषदांना योजनांतर्गत अनुदाने, इतर ग्रामीण पाणीपुरवठा योजना, (०२)(२९) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम-सहाय्यीकृत बाबी व पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षणासाठी अर्थसहाय्य (२२१५ ९९७१), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)"	३००००	१	३०००१	(+)२४९९९९	२८००००	सन २०१७-१८ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत चंद्रपूर व जालना जिल्ह्यात आर ओ संयंत्र बसविण्यासाठी येणारा रुपये २५ कोटी इतका अतिरिक्त खर्च भागविण्यासाठी निधीची आवश्यकता आहे.

Yashwant Tedgya Padvi

Digitally signed by Yashwant Tedgya Padvi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42f023d235c1f55c387492762e66530fd58085d2893f88445cf00fc7709a8080, serialNumber=c96ec3b84dfb89ca1fbee688d0dbc9e15c61e7e091602f1cc5c94657fc4d9c86, cn=Yashwant Tedgya Padvi
Date: 2018.03.27 16:09:56 +05'30'

(य. टे. पाडवी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.